e-news letter

ई-जलसेवा अभियान विशेषांक

# e जलसेवा Bulletin

Enabling efficient water management
कार्यक्षम जलव्यवस्थापनासाठी

Volume : III Issue : 6 October 2013

Government of Maharashtra
Water Resources Department

• Editor •
T. N. Munde

• Executive Editor •
Sharad Dabhadkar

• Editorial Board •
Mrs. Purnima Desai Mr.Prashant Kadam
Mrs. Dhanashree Limaye Mr.Avinash Patil

**Our Vision** *Transform WRD into modern & service driven department through Information & Communication Technology*

## संपादकीय



ई-जलसेवा प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून मिळत असलेला प्रतिसाद हा निश्चितच आनंददायक आहे. आत्तापर्यंत ३२०० प्रकल्पाची माहिती भरण्यात आली असून यानिमित्त सर्व अधिकाऱ्यांचे तसेच प्रत्यक्ष प्रणालीत माहिती भरणाऱ्यांचे अभिनंदन!

ई-जलसेवेचे सर्व स्तरातून स्वागत होत असल्याचे ई-जलसेवा अभियान कार्यक्रमांतर्गत दिसून आले.हाच उत्साह व गती कायम राहिल्यास जलसंपदा विभागाशी संबंधित राष्ट्रीयस्तरावरील हा पहिला यशस्वी प्रकल्प असेल यात माझ्या मनात शंका नाही. मा. प्रधान सचिवद्वय यांनी सुद्धा हा प्रकल्प यशस्वी होण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन व भक्कम पाठिंबा दिला आहे व वेळोवेळी त्याचा आढावा घेतला आहे हे नमूद करावे वाटते.

विशेष बाब म्हणजे सप्टेंबर महिन्यात १ लक्ष वापरकर्त्यांनी पोर्टलला भेट दिली असून आता हि संख्या १.६ लाखावर आहे. माहिती भरताना स्थानिक समस्या, अडचणी असल्या तरी त्यावर मात करून एवढ्या मोठ्या प्रमाणात माहिती भरली गेलेली आहे. प्रणालीत माहिती भरल्यानंतर आपणा सर्वांचे काम अधिक सुकर होणार आहे हे निश्चित. आपण एवढ्यावरच न थांबता यापुढे आता शासकीय कामकाज पद्धतीचे सुसुत्रीकरण (GPR) करून प्रशासन अधिक गतीमान व सुलभ करण्याचे काम हाती घ्यावयाचे आहे. त्यासाठी एनआयएसजी यांचे मार्फत विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे.

सामान्य नागरिक, शेतकरी व प्रकल्पग्रस्तांना यापुढेही माहिती उपलब्ध होणार असल्याने माहिती भरताना त्याची संपूर्ण पडताळणी करण्याकरिता आपले लक्ष पुन्हा एकदा वेधण्यात येत आहे. यावेळेसचा अंक ई-जलसेवा अभियानाच्या निमित्ताने चार पानी प्रसिद्ध करीत आहोत. तो आपणांस आवडेलच!

### Data Digitization Status (Ending Sep. 2013)

| Corporation | Project | Estimates | DTP | Contracts | RA Bills | LA Cases |
|---|---|---|---|---|---|---|
| GMIDC | 1190 | 3513 | 337 | 64 | 58 | 489 |
| MKVDC | 880 | 5181 | 682 | 281 | 249 | 683 |
| TIDC | 227 | 329 | 32 | 07 | 03 | 165 |
| VIDC | 697 | 1264 | 308 | 157 | 213 | 655 |
| KIDC | 216 | 669 | 115 | 18 | 56 | 333 |
| TOTAL | 3216 | 10986 | 1476 | 527 | 579 | 2325 |

(Source - e-Jalseva Portal)

## ई-जलसेवा:जलसंपदा विभागाचा उपक्रम



श्री.आ.भ.पाटील, कार्यकारी संचालक,
गो.म.पा.वि.महामंडळ, औरंगाबाद

सध्याचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग असून शासनाकडून तत्पर व पारदर्शक सेवेची अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. ई-जलसेवेच्या माध्यमातून या अपेक्षा पूर्ण करता येणार आहे. यासाठी जलसंपदा विभागाने ई-जलसेवा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेऊन व कार्यान्वित करून विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रणालीत विभागातील बहुतांश कार्य प्रकाराच्या अंतर्भाव असून या प्रणालीत माहिती भरण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न चालू आहेत. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे हे काही वर्षांपासून अविरत प्रयत्न करीत आहेत.

ई-जलसेवा अभियान १५ सप्टेंबर २०१३ ते १५ ऑक्टोबर २०१३ या कालावधीत महामंडळ कार्यालयात राबविण्यात येत असून दि. २३ सप्टेंबर २०१३ रोजी अभियानाचा प्रारंभ उत्साहात संपन्न झाला. या काळात ई-जलसेवा पंचसूत्री कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाने याबाबत वारंवार आढावा घेऊन आत्तापर्यंत ११८१ प्रकल्पांची माहिती भरली असून जलसंपदा विभागात आघाडी घेतली आहे. गोदावरी महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मी यानिमित्ताने अभिनंदन करतो व असाच उत्साह यापुढील काळातही ठेवण्याची अपेक्षा व्यक्त करतो. सध्या आपल्या सर्वांचा बहुतांश वेळ माहिती तयार करणे, त्याची पडताळणी करून संकलित करण्यात जातो. ई- जलसेवा प्रणालीमुळे आपल्याला याकामासाठी भविष्यात अधिक वेळ देण्याची गरज भारणार नाही. किंबहुना क्षेत्रिय व तांत्रिक कामाकडे अधिक लक्ष देता येणे शक्य होईल. या प्रणालीचा यापुढे दैनंदिन कामकाजात वापर करावयाचा असून सुरूवातीस काही कालावधीसाठी आपल्याला माहिती भरण्याकरिता अधिक परिश्रम घ्यावे लागतील. पण त्यानंतर मात्र आपल्याला या प्रणालीतील माहितीचा आपले दैनंदिन कामात उपयोग करता येणार आहे. अर्थात गरजेप्रमाणे व काळाप्रमाणे ई-जलसेवा प्रणालीमध्ये निरंतर सुधारणा केल्यास प्रणालीचा वापर अधिक प्रभावीपणे करता येईल.

कोयना संकल्पचित्र मंडळास यापुढील कामासाठी शुभेच्छा!



## गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ

### अभियान कार्यक्रम
### दि. २३ सप्टेंबर २०१३



मा.श्री.ए.बी.पाटील, कार्यकारी संचालक
अभियानासंबंधी मार्गदर्शन करताना



मास्टर ट्रेनर
मनोगत मांडताना



मा.श्री.जोगदंड, मुख्य अभियंता
अभियानासंबंधी मार्गदर्शन करताना



श्री.बनगीनवार, मास्टर ट्रेनर
मनोगत मांडताना

समन्वयक : श्री.शरद दाभाडकर का.अ.
श्री.अविनाश पाटील, स.अ.श्रे २



अभियान कार्यक्रमासाठी
उपस्थित अधिकारी वर्ग

## तापी पाटबंधारे विकास महामंडळ

### अभियान कार्यक्रम
### दि. २५ सप्टेंबर २०१३



मा.श्री. पी. आर. भामरे, कार्यकारी संचालक
अभियानासंबंधी मार्गदर्शन करताना




मा.श्री.सी.एन.हंगेकर, अधीक्षक अभियंता
अभियानासंबंधी विचार मांडताना




मा.श्री.एच.एम.शिंदे, मुख्य अभियंता
अभियानासंबंधी मार्गदर्शन करताना




श्री.विनोद बागुल, स.अ.श्रे १
अभियानासंबंधी मनोगत व्यक्त करताना

समन्वयक : श्री.शरद दाभाडकर का.अ.
श्री.अविनाश पाटील, स.अ.श्रे २



उपस्थित अधिकारी व कर्मचारी वृंद

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ

### अभियान कार्यक्रम
### दि. २३ ते २७ सप्टेंबर २०१३



पुणे येथील अधिकाऱ्यांना
ई-जलसेवा अभियानाबाबत सादरीकरण



मा.श्री.निटूरकर, अ.अ. व अधिकारी
चर्चासत्रात भाग घेताना



कोल्हापूर पाटबंधारे मंडळ येथील
अधिकाऱ्यांसाठी सादरीकरण

समन्वयक : श्री. शिवाजी राजळे, का.अ.
श्रीमती शिल्पा जाधव, स.अ.श्रे १

म.कृ.खो.वि.महामंडळाचे कार्यकारी संचालक मा.श्री.एस.एम.उपासे व दोन्ही मुख्य अभियंता यांची दि. १९ सप्टेंबर २०१३ रोजी भेट घेऊन अभियानाबाबत माहिती दिली. त्यांच्या सुचनेनुसार अधीक्षक अभियंता स्तरावर कार्यशाळा घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे पुणे येथे दि. २३ सप्टेंबर २०१३ रोजी दोन सत्रामध्ये कार्यशाळा घेण्यात आल्या. यामध्ये १०० अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला. त्यानंतर दि. २६ सप्टेंबर २०१३ रोजी सांगली व कोल्हापूर येथे कार्यशाळा घेण्यात आल्या. एकूण १५० अधिकारी या कार्यशाळेत उपस्थित होते. त्यानंतर दि. २७ सप्टेंबर २०१३ रोजी सातारा येथे तर दि.३० सप्टेंबर २०१३ रोजी सोलापूर येथे अभियाना संदर्भातील कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यशाळेसही खूप चांगला प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत विविध शंकांचे निरसन करण्यात येऊन प्रणालीचा वापर दैनंदिन कामकाजात करण्यासाठी आवाहन करण्यात आले. यावेळी प्रणालीबाबतच्या सुचनांची नोंद घेण्यात आली.

## कोकण पाटबंधारे विकास महामंडळ

### अभियान कार्यक्रम
### दि. २५ सप्टेंबर २०१३



कोकण पाटबंधारे विकास महामंडळांच्या
अधिकाऱ्यांसमवेत चर्चा



कोकण पाटबंधारे विकास महामंडळांच्या
अधिकाऱ्यांसमवेत सादरीकरण



कोकण पाटबंधारे विकास महामंडळांच्या
अधिकाऱ्यांसमवेत चर्चा

समन्वयक : श्री. प्रविण कोल्हे, का.अ.
श्री.नंदकिशोर रणावरे, स.अ.श्रे १

कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई येथे ई-जलसेवा अभियान राबविण्यात येत आहे. सदर अभियानाकरिता श्री. प्रविण कोल्हे, कार्यकारी अभियंता व श्री रणावरे, स.अ.-१ यांनी दि. २५ सप्टेंबर २०१३ रोजी कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे अंतर्गत असलेल्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. यावेळी कार्यकारी संचालक श्री. भिडे, मुख्य अभियंता श्री.सोनवणे यांचेसह सर्व अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता तसेच मास्टर ट्रेनर्स उपस्थित होते.

सदर कार्यक्रमादरम्यान ई-जलसेवा प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये शासनाची कर्तव्ये, ई-प्रशासनाची आवश्यकता, ई-प्रशासन प्रकल्पाचे जीवनचक्र आणि ई-जलसेवा प्रकल्पाची सद्यस्थिती, पुढील टप्पे आणि कार्यवाहीचे मुद्दे याबाबत माहिती दिली. त्या अनुषंगाने अचूक माहिती प्रणालीमध्ये भरुन त्याची पडताळणी करण्याबाबत आवाहन केले.



मा. श्री. प्र. चं. झपके, कार्यकारी संचालक यांची अधिकाऱ्यासोबत चर्चा.

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ

### अभियान कार्यक्रम
### दि. २० ते २१ सप्टेंबर २०१३

समन्वयक : श्री. श्रीनिवास, वरिष्ठ सल्लागार
कु. अंजु सोंडवले, स.अ.श्रे १



नागपूर येथील अधिकाऱ्यांना ई-जलसेवा अभियानाबाबत सादरीकरण

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक मा. श्री. प्र. चं. झपके यांनी दि. २० सप्टेंबर २०१३ रोजी अधिकाऱ्यांसमवेत प्रारंभीच बैठक घेऊन ई-जलसेवा अभियान राबविण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्व अधिकाऱ्यांसाठी झालेल्या कार्यशाळेत श्री. व्हि. एम. कुलकर्णी मुख्य अभियंता यांनी उपस्थित राहून संबोधित केले.

श्री. श्रीनिवास वरिष्ठ सल्लागार यांनी ई-जलसेवा अभियानाबाबत सादरीकरण करून उपस्थितांच्या विविध शंकाचे समाधान केले. सर्व मास्टर्स ट्रेनर्स यांच्या बरोबर दि. २१ सप्टेंबर रोजी चर्चा करून त्यांचा प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा घेतला. या कामासाठी कु. अंजू सोंडवले हिने मोलाचे सहाय्य केले. या अभियान कार्यक्रमास अधिकारी व कर्मचारी यांचेकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

## सिंचन व्यवस्थापन - मास्टर ट्रेनर्स प्रशिक्षण
### कालावधी: २३ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०१३



क्ष ण चि त्रे




## ई-जलसेवा वृत्तांत

1. 33 modules out of 34 are now available for data entry and usage.
2. e-Jalseva Abhiyan is rolled out with tremendous support from the field.
3. Data validation workshop for MTs conducted on 24th September 2013 at Koyna Design Circle, Pune
4. Total no. of visitors on WRD portal has crossed 1,60,0000.
5. A training for Govt Process Re-engineering (GPR) is arranged from 7th to 11th Oct. 2013 at Pune.
6. Master Trainers training for Management Modules is in progress at Meta Nashik & for canal Inspector at RTC Aurangabad.

प्रत्यक्ष डेटा भरण्यासाठी वापरावयाच्या संकेत स्थळाचा पत्ता
https://wrd.maharashtra.gov.in
सराव किंवा प्रशिक्षणासाठी वापरावयाच्या संकेत स्थळाचा पत्ता
http://wrdtest.maharashtra.gov.in/portal
ई-जलसेवा विषयक सर्व प्रकारच्या अडचणींसाठी /सल्ल्यासाठी
सहाय्यता केंद्र संपर्क क्र. : ०२०-२५४४०३९३
बांधकाम व व्यवस्थापन कार्यप्रकारातील नामांकने सत्वर पाठविण्यात यावीत.

**Be an ICIS e-news author......**



**We at ICIS e-news letter offer an opportunity to our readers to contribute articles and be a part of a family of ICIS e-news author. In particular, we will appreciate receiving contributions on articles bearing on innovative approach in e-governance, development and use of software in day to day**